
MAH/MUL/03051/201
ISSN-2319 931

# VIDYAWARTA®

Peer Reviewed International Referred Research Journal



Editor
Dr.Bapu G.Gholap

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक संशोधन पत्रिका

# विद्यावार्ता

Revised Edition

July To Sept. 2018
Issue-25, Vol-03

Date of Publication
30 Sept. 2018

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

14) पोलीस प्रशासनात महिलांचा सहभाग - एक दृष्टिक्षेप
श्री. सुर्यवंशी गोविंद मोतीराम, जि.नांदेड ||70

15) शेतजमिनीवरील प्लॉटींग व्यवसायाचे आक्रमण : बस्तान
प्रा. शिवाजी हुसे, जि. औरंगाबाद ||72

16) कुस्ती, मल्लविद्या एक प्राचीन भारतीय विद्या — एक अभ्यास
डॉ. अनुप केने & डॉ. अनिल वाळके, नागपूर ||75

17) सामाजिक अर्थसहाय्य योजना – एक दृष्टिक्षेप
प्राचार्य . डॉ. जे. एस. भोयर & प्रा. कु. आर. जी. भाकरे ||77

18) योग व्यायामाचा शाळेतील मुलींच्या मांसपेशी सहनशीलतेवर पडणारा प्रभाव—एक...
डॉ. वर्षा बारोकर & डॉ. सुरेखा धात्रक, नागपूर ||80

19) चंद्रपूर जिल्ह्यातील राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजनेचे आर्थिक मूल्यमापन
राजेश्वर उरकुडाची चापले, नागपूर ||82

20) पोलीस व प्रसार माध्यमातील संबंधी - एक दृष्टिक्षेप
श्री. सुर्यवंशी गोविंद मोतीराम, जि.नांदेड ||87

21) 'खानदेशातील ठेलारी समाजाचे उत्पन्न व खर्च - एक अभ्यास'
—प्रा.विलास व्ही. पाटील & प्रा.डॉ. डी.जी.पाटील, नंदुरबार ||89

22) बडोदा संस्थानातील मराठी वृत्तपत्र- जागृती
Prof. Vaishali Bagul ||91

23) 1990 नंतरचे आदिवासी कविता लेखन
प्रा. बोंतेवाड नागेश रामलू, औरंगाबाद ||93

24) 'सांगायची गोष्ट म्हणजे ': एक संवेदनशील अभिव्यक्ती
सहा. प्रा. डॉ. सारिका अशोकराव बुरगे, केज ||96

25) बाबुराव बागूलांच्या कथेतील स्त्री जीवन
प्रा.डॉ.मनमोहन विश्वनाथ राजे, जि. कोल्हापूर ||100

26) संस्कृत व्याकरणशास्त्र का उद्भव और विकास
डॉ. रामसिंह चौहान & डॉ. अशोक कुमार सैनी, जयपुर ||107

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

वापर झाला आहेच परंतु भावनांची यथार्थ संवेदनाशील अभिव्यक्ती करण्याचे सामर्थ्य त्यांच्या भाषाशैलीत आहे. दया पवार गेल्यानंतरच्या प्रसंगात स्वतःची मनोवस्था त्यांनी ज्या शब्दांत व्यक्त केली आहे त्यामुळे वाचकांचे ही काळीज हेलावते.

मुखपृष्ठावर दया पवारांसहच्या वैवाहिक जीवनातील कौटुंबिक छायाचित्रांच्या कोलाजने बनलेले गाठोडे चित्रित केल्यामुळे त्याचे सौंदर्य वाढले आहे. आत्मकथनातील आशयाचीही मुखपृष्ठाहून कल्पना येते. प्रत्येक वाचकाने वाचावे असे हे आत्मकथन आहे.

प्रस्तुत आत्मकथनातून दलित लेखिकांच्या अभिव्यक्तीमध्ये अशिक्षित किंवा अल्पशिक्षित दलित स्त्री ते उच्चशिक्षित व आधुनिकतेची कास धरलेली आणि वेळप्रसंगी सामाजिक चळवळीचे नेतृत्व करणारी स्त्री यांच्या जीवनातील संघर्ष समजून घेता आला. शिक्षण, आंबेडकरी विचार यांचा दलित समाजावर झालेला सकारात्मक परिणामासोबतच अजून अनेक ठिकाणी ते विचार अंगीकृत करण्यासाठी वाव असल्याची प्रकर्षाने जाणीव झाली. काळानुसार व परिस्थितीनुसार समाजा मध्ये बरेच बदल होताना दिसत आहेत. पण त्याचे सातत्य व बदलाचा वेग पुरेसा दिसत नाही तो वाढायला हवा हे जाणवले. त्याचप्रमाणे दलित बोलीभाषेतील वैविध्य, सृजनशीलता, विकास, वेगळेपण मराठी साहित्यविश्वात मोलाची भर घालणारे आहे.

**आधारग्रंथ :**

१) सांगायची गोष्ट म्हणजे-हिरा पवार, डिंपल पब्लिकेशन, ठाणे, प्र.आ १२/१२/२०१२

**संदर्भग्रंथ :**

१) दलित साहित्य : प्रवाह आणि प्रतिक्रिया-श्री वसंत पळशीकर, संकलन संपादन-प्रा. गो.म कुलकर्णी, प्रतिमा प्रकाशन, पुणे प्र.आ. १३-१-१९८६, पृ.१२६

२) ललित (जून-जुलै)२०१३- चरित्रे- आत्मचरित्रे विशेषांक- निलीमा गुंडी, संपा. अशोक केशव कोठावळे, पृ.४४

३) मौज (दिवाळी अंक) २०१२- मौज प्रकाशनगृह, पृ.११७

४) मराठीतील आत्मचरित्रपर लेखन -उषा हस्तक, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र.आ ३० मार्च २००६, पृ.१५५

५) साहित्य-लोक, ग्रामीण आणि दलित- डॉ. म. सु. पगारे, दलित साहित्य (खंड-३), दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्र.आ.७ जाने २०१२, पृ.११२

□□□

**25**

# बाबुराव बागूलांच्या कथेतील स्त्री जीवन

प्रा.डॉ.मनमोहन विश्वनाथ राजे,
शिवराज कॉलेज, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

***********

## १. प्रस्तावना :

दलित साहित्यामध्ये बाबुराव बागूल यांचे स्थान अग्रगण्य आहे. त्यांनी दलित, वैचारिक, समीक्षणात्मक स्वरूपाचे लेखन केलेले आहे. दलित कथेचे शिल्पकार म्हणूनच त्यांच्याकडे पाहिले जाते. सुरूवातीला त्यांनी कविता लिहिली असली, तरी पुढे ते कथा या वाङ्मय प्रकाराकडे वळले. भोवतालचा समाज हा विषमतेने भरलेला त्यांना आढळला. दलितांची दयनीय स्थिती त्यांना दिसल्यामुळे, कथेतून त्यांचे जग ते मांडू लागले. स्त्रियांच्यावर होणारा अन्याय, अत्याचार, सामाजिक अनिष्ट रूढी, त्यामध्ये पिचलेली स्त्री, अनिष्ट रूढींच्या द्वारे स्त्रियांचे केलेले शोषण बागूल कथांमधून मांडू लागले. 'आहार' नावाच्या मासिकांमध्ये १९५२ साली त्यांची 'दौलत' नावाची कथा प्रकाशित झाली. हळूहळू युगांतर, नवयुग अशा नियतकालिकांमधून त्यांच्या कथा प्रकाशित होऊ लागल्या, आणि कथाकार म्हणून बागुलांना प्रसिद्धी मिळू लागली. वास्तवपणे दलितांचे जीवन मांडणारा एक समर्थ कथालेखक म्हणून बाबुराव बागूलांनी आपल्या नावाचा दबदबा निर्माण केला. 'जेव्हा मी जात चोरली होती' (१९६३), 'मरण स्वस्त होत आहे' (१९६९) हे दोन कथासंग्रह तर 'सूड' (१९७०) ही दीर्घ कथा आहे.

## २. देवदासीची प्रथा :

भारतीय संस्कृतीमध्ये देवधर्माला अत्यंत महत्व दिले गेले असून, त्यामध्ये स्त्री गुंतली गेली. स्त्री जशी पुरूषाची सेवा करते, पुरूषाला जसा कामभोग देते तीच पद्धती देवधर्माच्या बाबतीत ठेवण्यात आली. स्त्रीने पुरूषाची भोगलालसा पूर्ण करावी या हेतूने स्त्री

नंतर दासीची 'देवदासी' बनली.. ''देवदासी म्हणजे एखाद्या देवतेला वाहिलेली मुलगी. अपत्य प्राप्तीकरिता किंवा अपत्य जगण्याकरिता पालक पहिले मूल देवाला वाहण्याचा नवस करतात, त्यालाच देवदासी म्हटलेले आहे.''[१] समाजातील निम्नवर्ग देवभोळा असतो. संकटावेळी देव आपल्याला मदत करतो, अशी श्रद्धा असल्यामुळे या वर्गातील लोक आपली मुले देवाला वाहतात. पहिली मुलगी असेल तर तिला देवाला वाहिले जाते. देवाची सेवा करत ती भोगदासी बनते. त्यानंतर हळूहळू ती वेश्या बनते.

२.१ मुरळी :

भारतातील विविध राज्यांमध्ये देवदासीची प्रथा रूढ आहे. देवदासी प्रथेमध्ये मुरळीचा अंतर्भात होतो. महाराष्ट्रामध्ये खंडोबाच्या सेविकेला 'मुरळी' असे म्हणतात. महाराष्ट्र आणि कर्नाटकमध्ये खंडोबा दैवताचे अनेक उपासक असनू ते निम्नवर्गीय समाजातील आहेत. अज्ञान, अल्पशिक्षण व दारिद्रय त्यांच्या पाचवीला पुजलेले असते. कुटुंबामध्ये सुखशांती नांदावी यासाठी ते देवाला साकडे घालतात. ''खंडोबाचे उपासक अपत्यप्राप्ती किंवा मूल खंडोबाला अर्पण करतात. मुलगा असल्यास तो वाघ्या बनतो व मुलगी असेल तर ती मुरळी बनते.''[२] मुरळीच्या अनिष्ट प्रथेमध्ये अडकलेल्या स्त्रीवर अन्याय अत्याचार प्रसंगी बलात्कार होतो. वाघ्याच्या आश्रयाने ती रहात असली तरीही तिच्यावर अन्याय होतोच.

२.२ मुरळीचा वेश्याव्यवसाय :

देवदासी प्रथेमध्ये अंतर्भाव होणारी मुरळी ही कालांतराने शरीर विक्रयाचा व्यवसाय करते. मुरळीचे तारूण्य जोपर्यंत असते, तोपर्यंत ती खंडोबाचा उपासक असणाऱ्या या वाघ्यासमवेत राहून उदरनिर्वाह करते. केव्हा केव्हा वाघ्या तिला सोडून देतो. मुरळीचे जीवन तिला एकटीला जगावे लागते. गावातील गावगुंड असणारे पुरूष तिला हव्या त्या वेळी भोग घेतात आणि सोडून देतात. तिला कोणताही पुरूष कायमचा आधार देत नाही. मुरळी निम्नवर्गातील असल्यामुळे तिला कोणीही जवळ करीत नाही. उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होतो, तेव्हा तिला वेश्याव्यवसाय करण्याशिवाय पर्याय नसतो. वेश्याव्यवसाय केल्यामुळे तिला गंभीर आजारांना सामोरे जावे लागते. त्यामध्येच एक दिवस तिचा मृत्यू होतो. देवदासीची पर्यायाने मुरळीची प्रथा ही अनिष्ट आहे. स्त्रीवर या प्रथेमुळे अन्याय अत्याचार होऊन तिचा बळी जातो.

३. बाबुराव बागूलांच्या कथेतील स्त्री :

बाबुराव बागूलांनी आपल्या कथांमधून स्त्रीच्या विशेषांचे चित्रण केले आहे. तिचे दु:ख, दारिद्रय, जगण्यासाठी तिची असलेली धडपड, तिला करावा लागलेला संघर्ष, अनिष्ट रूढींचा तिच्यावर झालेला परिणाम, पोटासाठी तिला करावा लागत असलेला वेश्याव्यवसाय, तो करत असताना तेथेही तिच्यावर होणारा अत्याचार असे सर्व बारीक सारीक तपशील बागूल आपल्या कथांमधून मांडतात. बागूल हे डोळस असल्यामुळे त्यांच्या दृष्टीस हे सर्व पडते. तेव्हा बागूलांमधील लेखक हा स्पष्टपणे लेखनातून ते मांडतो.

३.१ मुरळी प्रथेमधील स्त्री :

बाबुराव बागूल हे आपल्या कथांमधून स्त्रीचे चित्रण करीत असतांना, स्त्री दु:खाच्या गर्तेमध्ये सापडण्यासाठी कोणत्या प्रथा कारणीभूत ठरल्या तेही सांगतात. प्रामुख्याने दलित वर्गातील स्त्रीचे दु:ख बागूलांनी सांगितलेले आहे. अस्पृश्य स्त्रीच्या दु:खाला अनिष्ट प्रथा कारणीभूत ठरली. मुरळीची प्रथा ही अनिष्टच आहे. खंडोबाला मुली वाहिल्या जातात. त्यानंतर तिचा विवाह होत नाही. 'काळोखाचे कैदी' (जेव्हा मी जात चोरली होती, १९६३) आणि 'सूड' (सूड, १९७०) या दोन कथांमधून मुरळीसारख्या प्रथेमधील स्त्रीच्या दु:खाचे त्यांनी चित्रण केलेले आहे.

'काळोखाचे कैदी' या कथेमध्ये बाबुराव बागूलांनी अस्पृश्य समाजातील स्त्रीचे दु:ख मांडलेले आहे. बानू नावाच्या मुरळीच्या जीवनाची परवड या कथेमध्ये चित्रित झालेली आहे. 'मुरळी' म्हणून तिला खंडोबाला वाहिलेले असते. आपल्या मुलीचे—बानूचे आयुष्य उद्ध्वस्त होऊ नये म्हणून बानूचा बाप तिला रामराव देशमुखांच्या स्वाधीन करतो. रामरावांपासून तिला दौलत नावाचा मुलगा होतो. मात्र रामरावांची मर्जी सांभाळण्यासाठी ती त्याला दूर ठेवते.

बागूल बानूचे वेगवेगळया प्रकारचे दु:ख मांडतात. बानू ही एक अस्पृश्याची मुलगी असते. मुरळी आणि

अस्पृश्य स्त्रीचे दु:ख, तिच्याबद्दल असणारी सवर्ण पुरूषाची भोगवादी वृत्ती रामरावाच्या मृत्यूनंतर त्यांच्या मुलांकडून बानूवर घेतलेला सूड अशा सर्व अन्यायात होरपळणारी स्त्री—बानू प्रखरपणे मांडण्यात बागूल यशस्वी झालेले आहेत.

बानू अस्पृश्य असली तरी रामराव देशमुखांवर ती जिवापाड प्रेम करते. त्यांच्यापासून तिला मुलगाही होतो. बानू वीस वर्षे त्यांच्याशी एकनिष्ठ राहते. मात्र, रामरावांच्या मृत्यूनंतर त्यांचा मुलगा देवराम बानूकडे आई म्हणून न पाहता एक दलित अस्पृश्य स्त्री म्हणून पाहतो व अत्याचार करतो. रामरावच्या मृत्यूनंतर बानू परिस्थिती शरण अवस्थेत राहते. बानू देवरामला म्हणते, 'देवराम बाळा, दु:खाने असा धीर सोडू नको. माझा दौलत वेडा आहे. मी त्याच्यासाठी, माझ्यासाठी काहीही मागणार नाही, अंगावरल्या वस्त्रानिशी बाहेर पडेन.'' (पृष्ठ १८). बानूचा नि:स्वार्थ स्वभाव स्पष्ट होतो. बानू नात्याने देवरामची आई असते मात्र तो तिचा 'रांड', 'छिनाल' म्हणून उल्लेख करतो, तिचे लुगडे फेडण्याचाही त्याचा प्रयत्न असतो.

बानू ही अस्पृश्य स्त्री आणि तिही मुरळी असल्यामुळे देवरामसह त्याच्या गावातील इतर पुरूषांसह स्त्रियाही अन्याय करतात. कान्हुजी पाटील, सखा सोनार, पोलीस पाटील, कुलकर्णी, सुदामा, नामा, सुका या व्यक्ती बानूला उद्देशून अशोभनीय बोलतात. ''आणा घरून हाडळीला, नागवी करून धिंड काढू'' असे कान्होजी पाटील म्हणतो. ''इस वरसात त्या रांडचं नख दिसलं नाही'' असे पोलीस पाटील म्हणतो. देवरामची बायको गावातील स्त्रियाही बानूला वाईट वाईट बोलतात. बानू ही स्त्री असून आपल्यासारखेच आहे, असा कोणताही विचार स्त्री करत नाही. त्या तोंडसुख घेत असतात. बागूल 'काळोखाचे कैदी' हया कथेतून बानू नावाच्या स्त्रीची शोचनीय अवस्था दाखवतात. ती अस्पृश्य आणि अनिष्ट प्रथेत असल्यामुळेच तिला गावातील लोकांकडून त्रास होत असतो.

बाबुराव बागूल 'सूड' (१९७०) हया दीर्घ कथेतही मुरळीच्या अनिष्ट प्रथेमध्ये असलेल्या स्त्रीचे चित्रण करतात. कथेमध्ये दोन पिढयांमधील स्त्रीचे चित्रण येते. मुरळीची परंपरा सांभाळात वेश्याव्यसायात राहणारी, तशाच जीवनात मुलीला जगण्यास भाग पाडणारी आई तर मुरळीच्या जीवनापासून दूर जाणारी सर्वसामान्य जानकी अशा दोन स्त्रियांची चित्रणे दीर्घ कथेमध्ये येतात. आई, नवरा, सासू, सासरा आणि शेजारी या सर्वांकडून जानकीला स्त्री म्हणून पाहिले जात नाही, तर भोगवादी दृष्टीने पाहिले जाते.

'सूड' कथेची नायिका जानकी आहे. ती एका मुरळीची मुलगी असून तिची आई वेश्याव्यवसाय करते. रूपवान असणाऱ्या जानकीला ती वेश्याव्यवसायास लावण्याचा प्रयत्न करते. ती मुरळीची मुलगी असल्यामुळे गावातील कोणालाही तिच्याबद्दल जिव्हाळा नसतो. भोजनसामुग्री घेऊन घरी जात असलेल्या जानकीवर उडाणटप्पू पोरांची टोळी बलात्कार करते. बाबुराव बागूल बलात्कारानंतरच्या जानकीचे वास्तव चित्रण पुढीलप्रमाणे करतात, ''ती ध्यानावर आली तेव्हा तिची चोळी फाटलेली होती. बाळउर उघडे होते, हुळहुळत होते. गाल चावून लालबुंद झाले होते. पीठ अंगावर सांडलेले होते. तोंड घामाने भिजलेले होते. डोळे बधिर होऊन गेले होते. तोल सावरीत ओठ, गाल उराची चूरचूर सहन करीत ती रस्त्यावर आली.'' (पृष्ठ १८) बागूल बलात्काराचा परिणाम कसा होतो, त्यातून सावरणारी जानकी चित्रित करतात. जानकीवर होणाऱ्या बलात्काराच्या संदर्भात डॉ.म.ना. वानखेडे म्हणतात,''जानकी ही नायिका दलितांची. असले अमानुष अत्याचार घडणार कुणावर? दलित स्त्री कुणाच्याही मालकीची असते''[३] डॉ. वानखेडेंचं म्हणणे योग्यच वाटते. परंतु त्याच्या विधानावर रा. भि. जोशी यांनी आक्षेप घेतला आहे. ते म्हणतात, ''भावना चेतवायला हे विधान ठीक आहे. पण जरा अधिक विचार केला पाहिजे. जानकी ही एका मुरळीची मुलगी आहे. तिचे स्वत:चे खंडोबाशी लग्न झालेले आहे. म्हणजे तीही मुरळी आहे. मुरळी हा देवदासीचा प्रकार आहे. सगळयात देवदासी दलित वर्गातल्या नसतात. ज्या देवदासी वेश्या होतात, त्याच्यावार त्या त्या वेळी जे त्यांना पैसे देतात, त्याची त्या त्या पुरती मालकी असते, ती त्या दलित वर्गाच्या असतात म्हणून नव्हे, तर त्या वेश्यावर्गाच्या असतात म्हणून. आणि वेश्यांना

आपण दलित आहोत असे वाटत नसते. काही वेश्या प्रतिष्ठित असतात. आणि त्या आपली फी आपल्या मर्जीने वसूल करतात. जानकी दलित नाही, असे नाही पण 'दलित' शब्दाचा शिक्का म्हणून वापर करू नये.''[४] जोशींच्या विधानापेक्षा डॉ. वानखेडेंचे विधान अधिक योग्य वाटते. कारण जानकी मुरळीची मुलगी असली, तरी तिने स्वत: वेश्याव्यवसाय सुरू केलेला नाही. उलट त्याची तिला किळस वाटते. गंगूने आणि इतरांनी तिच्यार ते लादलेले असते. तिच्यावर तो अत्याचारच असतो.

जानकीवर बाहेरचे लोक तर अत्याचार करतातच, पण तिची आई गंगू आपला प्रियकर दगडूमार्फत अत्याचार करते. गंगू जानकीच्या जेवणात गांजा टाकते. जानकीस झोप येण्यापूर्वी दगडूला बलात्कार करण्यास सांगते. ती तिला खाली पाडते. तिने ओरडू नये म्हणून गंगू तोंड दाबते. आई अशा प्रकारे स्वत:च्या मुलीवरच स्वत:च्या स्वार्थापोटी अत्याचार करते. बागूल करते. बागूल त्याचे प्रत्ययकारी वर्णन करतात. जानकीला आपल्या आईच्या कृत्याचा पश्चाताप होत असला तरी ती असहाय्य असते. तिला तो सहन करावा लागतो. एक स्त्री स्वत:च्या मुलीवर अत्याचार करते. हे बागूलांना सांगावयाचे आहे.

स्त्रीचा जन्म जणू अत्याचार सहन करण्यासाठीच झालेला असतो काय? जानकीवर सर्वजण अत्याचार करतात. रसूल तिचा भोग घेऊन झाल्यानंतर बकरीला विकावे त्याप्रमाणे नायकिणीला विकतो. नायकिण तिला धंद्याला काढते. कुंटणखाण्यात वेगवेगळ्या पुरूष तिच्यावर शारीरिक अत्याचार करतात. तिच्या शरीराचे लचके तोडतात. रसूलाला विकण्याअगोदर सासू, सासरा, नवरा धंद्यासाठी तिच्यावर सक्ती करतात. जानकी नावाची स्त्री सर्वांकडून पिळली जाते तेव्हा तिला बंडखोरी करावी लागते.

जानकीचे साधूवेशातील रूप म्हणजे ज्वालाप्रसाद होय. जानकीवर लैंगिक अत्याचार होऊन तिच्या देहाचे हालहाल होतात. अपमान विटंबना ह्यामुळे ती निराश होते. आपण स्त्री असल्यामुळे आपल्यावर अत्याचार झाला. म्हणून स्त्रीदेह टाकून ती साधू वेशात राहते. एक प्रकारे ती स्त्रीत्वावर सूड उगविते. तिच्यावर होणाऱ्या अन्यायाला ती प्रतिकार करीत असते. तिच्यातून प्रक्षोभ व्यक्त होत असतो. डॉ. प्रकाश कुंभार म्हणतात, ''ही कथा केवळ जानकी या दलित मुरळीच्या जीवनसंघर्षाचे चित्रण करण्यापुरती मर्यादित रहात नाही. तर ती स्त्री म्हणून वाटयाला येणाऱ्या आखिल स्त्रीजातीच्या दु:खाच्या पलीकडे जाऊन बागूल स्त्रीत्वाचा गौरव व आदर्श माणसाचे चित्रण करतात.''[५] जानकी ज्वालाप्रसाद नावाने साधू होऊन वावरत असली तरी दक्षिणी भिक्षूक ज्वालाप्रसादला स्त्री समजतो. विद्याचरणही ज्वालाप्रसाद स्त्री समजून अत्याचार करतो. अशावेळी ज्वालप्रसाद संतापाने त्रिशूळ समोरच्या खांबावर फेकतो. हा पर्यायाने जानकीचा म्हणजेच ज्वालाप्रसाद आपला बंडखोरीपणा व्यक्त करतो. जानकीवर बलात्कारासारखे अत्याचार झाल्यामुळे तिला स्त्रीत्वाबद्दल चीड निर्माण होते. तिला पुरूष व्हायचे असते. त्यामुळे अन्याय कमी होईल असे वाटते. अन्याय अत्याचारा संदर्भात बागूल तटस्थपणे आपले भाष्य मांडतात. ते म्हणतात, ''स्त्रियांवर अन्याय आणि बलात्कासुद्धा विषमतापूर्ण समाजाचीच मानसिकता व्यक्त करतात. अन्याय अत्याचारांच्या अत्यंतिक विरोध जानकीच्या विचारातून व वर्तमानातून प्रकट होतो.''[६] हिंदू धर्म व्यवस्थेमध्ये जानकीवर अत्याचार होतो. मुरळीला समाजात स्थान नसल्यामुळेच तिच्यावर अत्याचार होतो. पुढे ती सूड उगविते. साधू झाल्यानंतरही तिच्यावरील अन्याय संपत नाही. काही बैरागी अत्याचार करतात. स्वसंरक्षणासाठी तिला 'जांबिया' जवळ ठेवावा लागतो. प्रस्तुत कथांमधून 'मुरळी' च्या अनिष्ट प्रथेतील स्त्रियांवर कसा अत्याचार होतो हे स्पष्ट होते.

### ३.२ वेश्या व्यवसाय करणारी स्त्री :

बाबुराव बागूलांनी आपल्या कथांमधून स्त्री जीवनाचे विविधांगांनी चित्रण केले आहे. ज्याप्रमाणे ते अनिष्ट प्रथेमध्ये अडकलेल्या स्त्रीला वेश्याव्यवसाय करावा लागतो. याची माहिती नोंदवितात. मुरळी, जोगतीण अशा अनिष्ट प्रथेमध्ये अस्पृश्य व सवर्ण समाजातील अनेक स्त्रिया कालांतराने त्यांना वेश्याव्यवसाय करावा लागतो. त्याची विविध कारणे आहेत. मात्र केवळ अनिष्ट प्रथेतीलच स्त्री वेश्याव्यवसाय करते असे नाही. तर अज्ञान अशिक्षित, दारिद्र्य यामुळेही अनेक स्त्रियांना वेश्याव्यवसाय करावा

लागतो. अशा स्त्रिया परिस्थितीशरण असतात. पाठीमागे त्यांचे कोणाशीही नातेसंबंध नसतात.. किंवा अशा स्त्रीला कुंटणखान्यामध्ये विकलेले असते. ती स्त्री नाइलाजाने वेश्या व्यवसाय करून कसातरी उदरनिर्वाह करते.

'वाटेवरची' (जेव्हा मी जात चोरली होती) या कथेमध्ये गिरीजाला मुलांच्या औषधासाठी आणि स्वत:चा उदरनिर्वाह करण्यासाठी वेश्याव्यवसाय करावा लागतो. त्यासाठी वाटेवर येऊन तिला गिऱ्हाईके शोधावी लागतात. एक चष्मेवाले गिऱ्हाईक तिला मिळते. दोन रूपयावर त्यांचा व्यवहार ठरतो. मात्र ते गिऱ्हाईक जादा पैसे देत राहते व कार्यभाग साधते. शेवटी तो तिला फसवतो. तिच्या हातातील सर्व पैसे हिसकावून घेतो. बागुल म्हणतात, ''तिच्या डोळयात सापाची क्षुब्धता आली. तिचा चेहरा संतापानं लाल झाला. तिने कंबरेला पदर गुंडाळला आणि ती सुरूंगासारखी भपकन भडकुन उठलीकृ ये भाडया, भडव्या पळतूस कुठं? पैसे टाक!'' गिऱ्हाईक तिच्याशी बेईमानी करते. ती त्याच्यावर तुटून पडते. मात्र त्याच्यासमोर तिची शक्ती कमी पडते. त्यातच तिचा मृत्यू होतो. मुलासाठी तळमळणरी व धंदा करणारी म्हणून गिरीजाचे बागूलांनी चित्रण केले आहे.

बागूल झोपडपट्टीतील विदारक जग समर्थपणे मांडतात. मुंबईच्या झोपडपट्टीतून फिरत असतांना त्यांना अनेक प्रसंग पहावयास मिळतात. 'मरण स्वस्त होत आहे' (मरण स्वस्त होत आहे) या कथेमध्येही झोपडपट्टी इतर प्रसंगाबरोबर वेश्याव्यवसाय पहावयास मिळतो. सोळा वर्षाच्या मुलीला टाकून आई पळून जाते. नंतर उदरनिर्वाह चालावा म्हणून ती मुलगी वेश्याव्यवसाय करते. ती निराधार आणि गरीब असल्यामुळेच वेश्याव्यवसाय करावा लागतो. मणी विकणारी स्त्री दिवसा मणी विकण्याचे काम करते. तर रात्री वेश्या व्यवसाय करते. बारकू आपल्या सुंदर मुलीच्या देहाचा बाजार मांडतो. पोटासाठी ती धंदा करते. केवळ दारिद्रय आणि अज्ञान हेच वेश्याव्यवसायाचे कारण आहे. भूक भागविणे हेच त्यांचे उद्दिष्ट आहे.

'मवाली' (मरण स्वस्त होत आहे) कथेतील गिरजा वेश्याव्यवसाय बंद करून एका व्यक्तीबरोबर राहते. मात्र एक मूल होताच, तो तिला टाकून देतो. पुढे गिरजा स्वत:साठी आणि मुलासाठी वेश्याव्यवसाय करते. गिरजा कर्मकहानी सांगते, ''एक दयाळू गिऱ्हाईक मला पळवून घेऊन आलं. एक मूल झालं अन् पळून गेलं. आता पोट भरण्यासाठी बंगल्यात दोघा पारश्याकडं मोलकरणीचं काम करते. अन सायंकाळी रस्त्यावर उभी ऱ्हाऊन धंदा करते. मूल मोठं झालंय. त्याच्यापुढं कसा धंदा करू?'' गिरजा परिस्थितीशरण आहे. तीही पोटासाठी धंदा करते. मुलगा मोठा झाल्यामुळे तिला धंदा नको वाटतो. अशी मुलाबद्दल आदर बाळगणारी वेश्या आणि तिच्यात आई असणारी स्त्री आहे.

जोगतीण, मुरळी यांचा अंतर्भाव देवदासीमध्ये होतो. जोगतीण यल्लम्मा देवीला वाहिलेली स्त्री असते. मुरळीला खंडोबाला वाहिलेली असते. जोगतीण, मुरळी कालांतराने वेश्याव्यवसाय करतात. यांना धार्मिक वेश्या किंवा देववेश्या म्हटलेले आहे. यासंदर्भात महादेवशास्त्री जोशींचे विधान महत्वपूर्ण वाटते. ते या संदर्भात म्हणतात, ''धर्माच्या नावाखाली चाललेल्या काही अनैतिक रूढीतूनही वेश्यावृत्ती उत्पन्न होते. देवाच्या ठेवलेल्या मुलींना देवदासी म्हणतात. देवाची प्रतिनिधी म्हणून पुजारी त्या मुलीचा उपभोग होतो, त्यामुळे त्या अपवित्र होतात. धार्मिक अंधश्रद्धेतून ही प्रथा उगम पावली. दक्षिण भारतातील काही देवालयात शेकडो देवदासी असत. त्या देवसेवेबरोबर वेश्याव्यवसाय करत.''७

'लुटालुट' (मरण स्वस्त होत आहे) या कथेतील गंगू यल्लम्मा देवीची भक्त असते. ती वेश्या व्यवसाय करत असते आणि हेच आपले जीवन आहे असे तिला वाटत असते. वंचळा नवऱ्याच्या त्रासाला कंटाळून बापाकडे येते आणि बाप पैशासाठी तिला कुंटणखण्यात ढकलतो. गंगूचा नवराही सावकाराकडून जमीन सोडविण्यासाठी गंगूला नायकिणीला विकतो. पुढे गंगू आड्डा चालविते. तेथे वंचळाबरोबर पुतळा, सोनी या स्त्रिया असतात. परिस्थितीमुळे त्या वेश्याव्यवसाय करतात. गंगू व वंचळा या दोन वेश्यांचा संघर्षही बागूलांनी सांगितला असून खोली, पलंग, पोलिसाचे हप्ते अशा वेगवेगळया पातळयांवर वेश्येची लूट होते. आर्थिक आणि शारीरिक पातळीवर होणारे वेश्येचे बागूल चित्रित करतात.

'सूड' (सूड) कथेमध्येही वेश्या जीवनाचे चित्रण आलेले आहे. जानकी नावाच्या मुरळीची पर्यायाने स्त्रीची कथा आलेली आहे. जानकीची आई गंगू ही मुरळी असते. तिला वेश्याव्यवसायाबद्दल संकोच नसतो. जानकीचे वेश्याव्यवसाय करावा यासाठी प्रयत्न करते. गंगू जानकीला म्हणते, ''तुला कंच्या गधडीनं हे सतपण शिकवलय. अगं, भरात आलीस. सुरू कर. मजा कर.''(पृ.२०) अशा पद्धतीने सरळ वेश्याव्यवसाय करण्यासाठी गुंगू जानकीला प्रवृत्त करते. रसूल

जानकीला नायकिणीकडे विकतो. तेथे तिच्यावर अत्याचार होतो. वेगवेगळे पुरूष तिच्यावर अत्याचार करतात. जानकीला धंद्याची किळस वाटते. पुढे ती स्वत:ची सुटका करून घेते व साधू बनते. गंगू ही मुरळी असल्यामुळे वेश्याव्यवसाय करते. व स्वत:च्या मुलीला त्याच धंद्याला लावते. मात्र जानकीला धंद्यामध्ये वाईट अनुभव आल्यामुळे ती बाहेर पडते. देवदासी स्त्रिया असल्यामुळे कालांतराने वेश्याव्यवसाय करतात. मदन कुलकर्णी म्हणतात, ''देवीला मुलगी वाहण्याची प्रथा सुरू झाल्यानंतर त्यांनी अविवाहित राहिले पाहिजे, असा दंडक असल्याने त्या स्त्रियांचे नैतिक स्खलन झाले असणार हे उघड आहे. त्यामुळे प्रस्थापितांचा बाहेरख्यालीपणा आणि अशा स्त्रियांची दैहिक गरज यातून देवदासी प्रथेत वेश्यावश्तीचा प्रारंभी प्रवेश झाला असणे शक्य आहे. पुढे त्यांच्या जीवनाचा तो एक भाग होऊन बसला.''[८] अगोदरची धर्मिक प्रथा आणि पुढे शरीराची गरज आणि त्यानंतर पोटा पाण्याचा प्रश्न म्हणूनच मुरळी वेश्या व्यवसाय करते.

### ३.३ प्रथा परंपरा मानणाऱ्या स्त्रिया :

बागूलांच्या कथेमध्ये प्रामुख्याने अंधश्रद्धाळू स्त्रियांची चित्रणे आलेली आहेत. झोपडपट्टीमध्ये राहणारा समाज हा पूर्णपणे अल्पशिक्षित आहे. त्याच्यावर देवधर्माचा पगडा असल्यामुळे तो अंधश्रद्धेच्या आहारी गेलेला असतो. त्यातही स्त्रियांवर देवधर्माचा व अनिष्ट प्रथांचा अधिक प्रभाव असतो. साहजिकच त्या अंधश्रद्धाळू असून प्रथा परंपरा मानतात. बानू (काळोखचे कैदी) ही मुरळी असते. फटका भरणे, चेडा घालणे, भंडारा फेकणे हे बानूच्या बाबतीत गैरसमज असतात. नवस फेडण्यासाठी तिला मुरळी म्हणून सोडलेले असते. 'पेसूक' (जेव्हा मी जात चोरली होती) कथेतील सावित्री नवऱ्याच्या परवानगीने परपुरूषाच्या मार्फत पुत्रप्राप्ती करून घेते. मात्र नवरा तिला दोषी ठरवतो. त्याचा अत्याचार सहन करूनही त्याच्या मश्त्यूनंतरही ती सती जाते. बागूल त्यातून सतीप्रथेतील सावित्री दाखवितात. 'मरण स्वस्त होत आहे' (मरण स्वस्त होत आहे) या कथेतील पांगळ्या बाळकूची पत्नी स्वत:ला पतिव्रता समजते. तर सारजा स्वत:ला सत्सावित्री समजते. 'वानर' (जेव्हा मी जात चोरली होती) कथेतील बापूची आई सुनेने मुलाच्या लंगोटयाला हात लावल्यामुळे तो विटाळला म्हणून मुलामार्फत सुनेला मारहाण करते. गंगू, जानकी (सूड) याही स्त्रिया अज्ञान आणि अंधश्रद्धेमुळे मुरळीच्या प्रथेमध्ये अडकतात. समाजामधील आणि विशेषत: दलित समाजातील स्त्रिया अनेक अनिष्ट प्रथा परंपरांचे पालन करतात. देवधर्माच्या बाबतीत त्या जागृत न राहिल्यामुळे त्यांच्यावर संकटे येतात.

### ३.४ स्त्रिया–स्त्रियांमधील संघर्ष :

बागुलांच्या अनेक कथांमध्ये दोन किंवा अधिक स्त्रियांची चित्रणे आलेली आहेत. त्यांचे आपापसामध्ये विविध कारणांवरून संघर्ष असतात. बानू (काळाखाचे कैदी) ही अस्पृश्य असून ती मुरळी असते. रामराव देशमुखांची ती रखेल म्हणून वावरते. मात्र त्यांच्या मृत्यूनंतर अनेक स्त्रिया तिच्यावर अत्याचार करतात. ''बाने मुरळे, भुताळे तू माझं वाटोळं केलसं. '' असे देवरामची पत्नी कमला बानूला बोलते. देवरामला घाबरून रस्त्याने जीव वाचवण्यासाठी पळणाऱ्या बानूचा वयाने म्हातारी असणारी स्त्री 'छिनाल' म्हणून उल्लेख करते. ''काश्या, धर फेड लुगडं, नीच जातीची मुरळी असून ही देशमुखीन बनली होती.'' असे मारूतीच्या देवळाजवळ एक बाई बोलते. असा बानू बद्दलचा द्वेश व संघर्ष कथेमध्ये येतो. बापू पहिलवानाच्या (वानर) आई आणि पत्नी मध्ये मतभेद असतात. सासू सुनेवर नेहमी संताप व्यक्त करते. म्हातारी यमुना व तिची तरूण सून चंद्रा (स्पर्धा) यांचा केळी विकण्यावरून संघर्ष असतो. चंद्राकडे जास्त गिऱ्हाईकं जातात. यमुनेचा धंदा होत नाही यावरून दोघींच्यात संघर्ष होतो. धंदा व्हावा म्हणून यमुना गावाकडच्या नव्या तरूण सुनेला आणते. स्पर्धेतून सासू सुनेचा संघर्ष बागूल चित्रित करतात. वंचळा आणि गंगू (लुटालूट) हया दोघींमध्ये वेश्येच्या धंद्यावरून व पैशावरून भांडण होते. वंचळाला गंगूचा मुडदा पाडावा वाटतो. जानकी व गंगू (सूड) या मायालेकीमध्येही मोठा संघर्ष होतो. त्यामुळे जानकीचे जीवन उद्ध्वस्त होते. गंगू वेश्याव्यवसाय करते. जानकीनेही करावा म्हणून ती तिच्यावर जबरदस्ती करते. जानकीचा नकार असतो. गंगूचा जानकीवरील अत्याचार अशोभनीय असतो. जानकीला जेवणात गांजा देऊन आपल्या प्रियकराकडून बलात्कार करते. ''गंगूने तिला खाली पाडले, तिच्या दोन्ही दंडावर पाय देऊन ती तिच्या ऊरावर बसली, तिने ओरडू नये म्हणून तिचे तोंड दाबले.'' अनिष्ट गोष्टीला जानकीचा नकार असतो. त्यामुळे आई आणि मुलगीमध्ये संघर्ष पेटतो. त्यामुळे स्त्रीत्व नाकारून जानकी साधूरूपामध्ये राहते. स्त्रिया–स्त्रियांमध्ये संघर्ष वेगवेगळया कारणांमुळे

होतो हे बागूल स्पष्ट करतात.

### ३.५ शोषित स्त्री :

बाबुराव बागूलांच्या कथांमधील स्त्रियांच्या कथा या हालाच्या आणि शोषणच्या कथा आहेत. बानू मुरळीचे (काळोखाचे कैदी) रामराव देशमुख एक प्रकारे शोषण करतात. त्यांची मर्जी सांभाळण्यासाठी ती स्वतःच्या मुलाला दूर ठेवते. तिचे शारीरिक शोषणही झालेले आहे. गिरिजा (वाटेवरची) स्वतः जगण्यासाठी व मुलाला जगविण्यासाठी धंदा करते, तेव्हा गिऱ्हाईक तिचे शारीरिक शोषण करते व त्यांच्यामुळेच तिचा मृत्यू होतो. वंचळा (लुटालूट) आणि गंगूचे शोषण होते. सिद्राप्पा, पोलिस गंगूचे आर्थिक शोषण करतो. तर गंगूच्या अड्डयावर वंचळा, पुतळा, सोनी यांचे वेगवेगळया पद्धतीने शोषण सुरू असते. बागूलांनी जानकीचे (सूड) विविधांगांनी कसे शोषण होते ते सांगितले आहे. तिचे शोषण हे समाजातील प्रत्येक घटक करत असतो. दळप घेऊन येताना टारगट मुले तिच्यावर बलात्कार करतात. आई म्हणजेच गंगू जानकीने वेश्या व्यवसाय करावा म्हणून प्रियकराकरवी शोषण करते. रसूल, जानकीचा नवरा, सासू सासरे सर्वजण शारीरिक शोषण करतात. एवढेच नव्हे तर स्त्रीत्वाचा त्याग करून तेव्हा ती ज्वालाप्रसाद बनते, तेव्हाही ज्वालाप्रसाद बनलेल्या जानकीचे शोषण चालू असते.

### ३.६ दारिद्रयातील स्त्री :

बागूलांच्या कथेतील स्त्रिया प्रतिकूल परिस्थितीशी सामना करत जीवन जगताना दिसतात. त्यामध्ये काहींचा मृत्यू झालेला आहे. केरवा मणीवाली, कच्छकडील झाडूवाली, (मरण स्वस्त होत आहे), फासेपारध्यांच्या टोळीतील आजी, झुडूपात बाळंत होणारी भिकारीण, सोना (मैदानातील माणसे) गंगू, वंचळा, पुतळा, सोना (लुटालूट), नटा (भांडवल), गिरजा (वाटेवरची), पांडूची आई (आई) मुलाच्या भुकेमुळे व्याकूळ अगतिक दिनवाणी झालेली व मुलाची भूक भागविण्यासाठी नदीवर जाऊन मासे आणणारी भागू (भूक) ही भूकबळी असते. दारिद्रयामुळे तिला मुलाला अन्न देता येत नाही. शेवटी भागूचा तापामुळे मश्त्यू होतो. भूक दारिद्रय आणि ताप यामुळे भागू कोळीणीचा मश्त्यू होतो. कथांमधील या सर्व स्त्रिया अत्यंत दरिद्री अवस्थेमध्ये वाटचाल करतात. दारिद्रयामुळे उदरनिर्वाह होत नसतो. उदरनिर्वाह व्हावा यासाठी काही स्त्रियांनी वेश्याव्यवसाय सुरू केलेला असतो. त्यामध्येही त्यांना फसविले जाते. शेवटी त्या दरिद्रीच राहतात हे बागूल सांगतात.

### ४. समारोप :

बाबुराव बागूलांनी दोन कथासंग्रह आणि एक दीर्घ कथा यांमधून स्त्रियांची विविध प्रकारची चित्रणे केली आहे. या स्त्रिया झोपडपट्टीमध्ये वास्तव्य करतात. व्यथा, वेदना, दारिद्रय यामध्येच त्या जगतात. त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न मोठा आहे. त्यासाठीच त्या वेश्याव्यवसाय करण्यास प्रवश्त्त होतात. देवदासींमध्ये मुरळीची, जोगतीणीची अनिष्ट प्रथा आहे. कथांमधील स्त्रिया या निम्नवर्गातील असून अशिक्षित अज्ञानी आहेत. त्यातूनच काही स्त्रिया देवाधर्माला त्या प्राधान्य देतात. त्यातूनच काही स्त्रिया मुरळी, जोगतीण म्हणून वावरतात. पुढे त्यांनाही वेश्याव्यवसाय करावा लागतो. वेश्याव्यवसाय करण्यासाठी काही स्त्रियांवर जबरदस्ती होत असते. एका स्त्रीने दुसऱ्या स्त्रीचा आदर करावा हे अपेक्षित आहे. मात्र बागूलांच्या अनेक कथांमधील स्त्रिया एकमेकींवर अत्याचार करतात. त्यामध्ये काही स्त्रियांचा बळी गेलेला आहे. बागूलांनी अशा पद्धतीने अनेक स्त्रियांची चित्रणे केली असून त्यांच्या अंगभूत गुणदोषासह समोर आल्या आहेत. बागूल त्यामध्ये यशस्वी ठरलेले समर्थ दलित कथाकार असून ते दलित कथेचे शिल्पकार आहेत.

### ५. संदर्भग्रंथ :

१. जोशी लक्ष्मणशास्त्री, 'मराठी विश्वकोश', खंड ७, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७७, पृ. ९१०.

२. तत्रैव, खंड १५, पृ. १२५७.

३. वानखेडे म.ना., 'भूमिका', बाबुराव बागूल, 'सूड', लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई, १९७०, पृ. ७.

४. जोशी रा.भि. 'सत्यकथा', मुंबई, मे १७७२, पृ. ४२, ४३.

५. कुंभार प्रकाश, 'दलित कथासाहित्य' प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, १९९१, पृ. १७३.

६. बागूल बाबुराव, 'दलित साहित्य : आजचे क्रांतिविज्ञान' बुद्धिष्ट पब्लिशिंग हाऊस, नागपूर १९८१, पृ. २२३.

७. जोशी महादेवशास्त्री, (संपा.) 'भारतीय संस्कृतिकोश', खंड ९, भारतीय संस्कृतिकोशमंडळ प्रकाशन, पुणे, १९६७, पृ. १०५.

८. कुलकर्णी मदन, 'देवदासी : यल्लमांच्या जोगतिणी', विजय प्रकाशन, नागपूर, १९९४, पृ. ३१.